15 DEC 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर

# एकीमुळे भारतीय संस्कृती अबाधित

## डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन : 'ग्यान' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अमेरिकेमधील विविध प्रांत स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वतंत्ररीत्या लढले आणि नंतर एकत्र आले. भारतातील विविध संस्थाने, महात्मा गांधीजी आणि इतर स्वातंत्र्य सैनिकांच्या हाकेला प्रतिसाद देत या ठिकाणच्या सर्व जातीधर्मांतील लोकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढा दिला. त्यामुळे भारताला आपली संस्कृती जपणे शक्य झाले. अमेरिकेवर मात्र ब्रिटिश संस्कृतीची छाप कायम आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी गुरुवारी येथे केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्यान' या उपक्रमांतर्गत कार्यशाळेत प्रा. डॉ. ब्राऊन हे विशेष




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'ग्यान' उपक्रमांतर्गत आयोजित कार्यशाळेत गुरुवारी बोलताना प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन.**

व्याख्यानात शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन करत होते.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरूममध्येकार्यशाळेचेउद्घाटन झाले. कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे तर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के होते. प्रा. डॉ. ब्राऊन हे 'अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण' या विषयावर २० डिसेंबरपर्यंत व्याख्यानांद्वारे मार्गर्शन करणार आहेत. 'ग्यान' उपक्रमांतर्गत ही सातवी कार्यशाळा होत आहे.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, देशातील वीस निवडक विद्यापीठांना अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे 'ग्यान' सारखे विशेष उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविणे विद्यापीठांना शक्य होणार' आहे. उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी उपक्रमाची माहिती दिली. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी कायदे सल्लागार डॉ. संतोष शहा, डॉ. भारती पाटील, डॉ. अनुष्का कदम, डॉ. संजय पाटील तसेच विधी अधिविभाग व समाजशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांसमवेत मुंबई, चेन्नई, बिहार येथून आलेल्या विद्यार्थ्यांची विशेष उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2017
लोकमत

# स्वातंत्र्यासाठी एकत्र लढल्याने भारतीय संस्कृती अबाधित

## मार्क डेव्हिड ब्राऊन : विद्यापीठात 'ग्यान'अंतर्गत व्याख्यानास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्वातंत्र्यासाठी एकत्र येऊन लढल्यामुळेच भारतीय संस्कृती अबाधित राहिली आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील 'वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी'चे ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील विशेष व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर प्रमुख उपस्थित होते. 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अकॅडेमिक नेटवर्क' (ग्यान) उपक्रमांतर्गत



शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यानात प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी मार्गदर्शन केले.

'अंडरस्टँडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अंडर द युनायटेड स्टेट्स अँड इंडियन कॉन्स्टिट्यूशन : अ कम्पॅरेटिव्ह ॲनालिसीस' या विषयावर प्रा. ब्राऊन यांचे विशेष व्याख्यान विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरूममध्ये आयोजित केले आहे. त्यांचे व्याख्यान दि. २० डिसेंबरपर्यंत होणार आहे. प्रा. ब्राऊन म्हणाले, अमेरिकेमधील विविध प्रांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्वतंत्ररित्या लढले आणि नंतर एकत्र आले. भारतातील विविध संस्थाने, महात्मा गांधीजी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या हाकेला प्रतिसाद देत या ठिकाणच्या सर्व जाती-धर्मातील लोकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढा दिला. त्यामुळे भारताला संस्कृती जपणे शक्य झाले. कायदे सल्लागार संतोष शहा, भारती पाटील, अनुष्का कदम, संजय पाटील, आदी उपस्थित होते. समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी उपक्रमाची माहिती दिली. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

15 DEC 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकीने लढल्यामुळेच भारतीय संस्कृती अबाधित

## ग्यान उपक्रमात डॉ. मार्क ब्राऊन यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : ग्यान उपक्रमात बोलताना अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन. सोबत अन्य मान्यवर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
अमेरिकेमधील विविध प्रांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्वतंत्ररीत्या लढले आणि नंतर एकत्र आले. भारतातील विविध संस्थाने, महात्मा गांधीजी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या हाकेला प्रतिसाद देत या ठिकाणच्या सर्व जातिधर्मातील लोकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढा दिला. त्यामुळे भारताला आपली संस्कृती जपणे शक्य झाले; मात्र अमेरिकेवर ब्रिटिश संस्कृतीची छाप कायम आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क' (ग्यान) उपक्रमांतर्गत 'अंडरस्टँडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अंडर द युनायटेड स्टेटस् अँड इंडियन कॉन्स्टिट्यूशन : अ कम्पॅरेटिव्ह अॅनालिसीस' या विषयावर ब्राऊन यांचे विशेष व्याख्यान विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्च्युअल क्लासरूममध्ये आयोजित केले होते, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के उपस्थित होते.

ब्राऊन अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण २० डिसेंबरपर्यंत व्याख्यानांद्वारे करणार आहेत. ग्यान उपक्रमांतर्गत ही सातवी कार्यशाळा विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर म्हणाले, अन्याय, अत्याचार, हिंसा आणि शोषणाविरुद्ध लढा देताना न्यायपालिकांनी महत्त्वपूर्ण अशी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे.

विद्यापीठाच्या ग्यान उपक्रमाचे समन्वयक आर. के. कामत यांनी उपक्रमाची माहिती विशद केली. व्ही. वाय. धुपदाळे यांनी स्वागत करून पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी कायदे सल्लागार संतोष शहा, भारती पाटील, अनुष्का कदम, संजय पाटील तसेच विधी अधिविभाग व समाजशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांसमवेत मुंबई, चेन्नई, बिहार येथून आलेल्या विद्यार्थ्यांची विशेष उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2017
Times of India

# GIAN lectures begin at SUK, will continue till Dec 20

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Mark Brown, faculty from Washington State University, gave a special lecture on law under the Global Initiative of Academic Networks (GIAN) at Shivaji University, Kolhapur (SUK) on Thursday.

"Different states in America fought separately for freedom and then came together. In India every citizen came forward and fought with Mahatma Gandhi for country's freedom, and this is why we should nourish our culture," he said, adding due to this difference in the freedom struggle, there is still a shadow of British culture in the US.

Brown will be delivering lectures on 'Understanding the allocation of power under the United States and Indian constitutions: A comparative analysis' till December 20 at the SUK.

This initiative of the ministry of human resource development (MHRD) will provide guidance from international experts on various courses. Like the previous year, the varsity is hosting foreign faculties from different fields.

SUK's pro vice-chancellor D T Shirke said the university is among 20 other varsities selected from across the country under the GIAN scheme. "Universities with better National Assessment and Accreditation Council (NAAC) grade and important memorandum of understandings (MoUs) were selected," he said.

One criterion for attending the GIAN courses is that limited number of students will be allowed to attend the expert lectures of which 50% should be from other universities.

Last year, experts from Lomonosov Moscow State University (Russia), Purdue University, University of Michigan (both from the US) and Asian Institute of Technology (Thailand) delivered lectures at the SUK.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2017
पुण्यनगरी

# 'नॅक'साठी कामात सातत्य हवे

## - डी. टी. शिर्के : महावीर महाविद्यालयामध्ये नॅकवर कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

नॅकची प्रक्रिया निरंतर आणि नियमितपणे चालणारी आहे. नियमितपणे नॅकचे काम करत राहिल्याने चांगले मानांकन मिळवता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महावीर महाविद्यालयात 'नॅक'बाबत आयोजित कार्यशाळेत बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. एस. एम. पाटील होते.




**कोल्हापूर : नॅकबाबत परिषदेचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. गणेश हेगडे, डॉ. विनायक शिरगूरकर, डॉ. गिरीश चिंधडे. प्रा. एस. एम. पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे आदी.**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्याकडून नव्याने कार्यान्वित झालेल्या मूल्यांकन पद्धतीबाबत महाविद्यालयअंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. शिर्के म्हणाले, पहिल्या दिवसापासून नॅकच्या बदललेल्या मूल्यांकन पद्धतीनुसार पुढील मूल्यांकनाची तयारी महावीर महाविद्यालयाने सुरू केली, हे अभिनंदनीय आहे. नियमितपणे डाक्युमेंटेशनचे काम व्हायला हवे. त्यासाठी महाविद्यालयातील सर्व घटकांनी कामामध्ये सातत्य ठेवणे महत्त्वाचे आहे. डॉ. गणेश हेगडे यांनी बीजभाषणातून नव्या मूल्यांकन पद्धतीबाबत विस्तृत विश्लेषण केले. त्यांनी बदलत्या मूल्यांकन पद्धतीचा आढावा घेऊन त्यातील सयुक्तिकता स्पष्ट केली.

प्राचार्य डॉ. विनायक शिरगूरकर (पुणे), नॅक पीअर टीम मेंबर डॉ. गिरीश चिंधडे (पुणे), डॉ. एच. व्ही. देशपांडे (कोल्हापूर), डॉ. एम. एस. पद्मिनी यांनी मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख सहनिमंत्रक डॉ. बी. ए. नाईक यांनी करून दिली. आभार प्रा. श्रीकांत बच्चे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कल्पना गंगातीकर यांनी केले. महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक कार्यक्षेत्रातील सर्व प्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक, सदस्य उपस्थित होते. संयोजन सचिव प्रा. प्रदीप गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक प्रा. अजित चौगुले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2017

महाराष्ट्र टाईम्स



# 'नॅक मूल्यांकन कामात सातत्य हवे'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

नॅकची प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. त्यामुळे मूल्यांकनासाठी महाविद्यालय पातळीवर प्रशासकीय कामात सातत्य हवे. असे झाल्यास नॅकमध्ये चांगले मानांकन मिळवता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठचे प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. येथील महावीर महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. एस. एम. पाटील अध्यक्षस्थानी होते.

शिर्के म्हणाले की, नॅकची पुढील मूल्यांकन तयारी सुरू करण्यात आली आहे. महाविद्यालय पातळीवर नियमित माहिती अपडेट करीत राहिल्यास नॅकचे मूल्यमापन करताना त्याची चांगली मदत होईल.

नॅकचे सहायक सल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी बदललेल्या मूल्यांकन निकषांची माहिती घावी, असे आवाहन केले. प्रा. पाटील यांचे अध्यक्षीय भाषण झाले. प्राचार्य डॉ. विनायक शिरगूरकर, शिरीष चिंधडे, एच. व्ही. देशपांडे, एम. एस. पद्ममिनी यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. बी. ए. नाईक यांनी ओळख करून दिली. सचिव प्रदीपं गायकवाड, अजित चौगुले यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी सूत्रसंचालन केले. श्रीकांत बच्चे यांनी आभार मानले.